# राष्ट्रीय आरोग्य अभियान,अकोला(NHM)
## कार्यालय : जिल्हा आरोग्य अधिकारी,
## जिल्हा परिषद,अकोला

दुरध्वनी क्रं : (०७२४)२४३७३७०,२४३५०७५
फॅक्स क्रं : (०७२४)२४३७३७०
E-mail : dpmnrhmakola@gmail.com

राष्ट्रीय आरोग्य अभियान,कार्यालय,आकाशवाणी केंद्रा समोर,जि.प.कर्मचारी कल्याण भवन परिसर,सिव्हील लाईन रोड,अकोला-४४४००१


| स्पीडपोस्ट/ईमेलव्दारे/हस्तदेय | जा.क्र.जिप/आवि/डिपीएमयु/ १६५१ /२०२६ | दिनांक :१३/०५/२०२६ |
|---|---|---|

## उमेदवारांकरिता सुचना / नोटीस

राष्ट्रीय आरोग्य अभियान अंतर्गत विविध पदे विविध कार्यक्रमांतर्गत पुर्णतः कंत्राटी पध्दतीवर Early Interventionist cum special educator, Audiologist & Speech therapist, Instructor for Hearing Impaired Children, Budget & Finance Officer, Optometrist, Dental Hygienist, Audiometric Assistant, Dental assistant, District Program manager – Ayush, Facility Manager (Implementation Engineer) सदर पदांची पदभरती करणेकरिता जि.प.वेबसाईटवर तसेच दि.१२/०२/२०२६ रोजी वृत्तपत्रात जाहिरात प्रसिध्द करण्यात आली होती. त्या अनुषंगाने उमेदवारांनी या कार्यालयास संवर्गनिहाय शैक्षणीक पात्रतेसह आवेदन सादर केले तसेच प्राप्त आवेदना सोबत जोडलेल्या कागदपत्रांची पडताळणी करुन प्रथम संभाव्य पात्र व अपात्र यादी जि.प.वेबसाईटवर प्रसिध्द करुन उमेदवारांकडुन आक्षेप मागविण्यात आले होते. त्या नुसार उमेदवारांनी नोंदविलेल्या आक्षेपांचे निरासरण करुन पात्र व अपात्र यादी तयार करण्यात आली आहे.

परंतु मा.सहसंचालक,(अतांत्रिक), रा.आ.अ.मुंबई यांचे पत्र क्र ८९७२-९०५४ दि.२७.०४.२०२६ अन्वये राज्य आरोग्य सोसायटी,मुंबई यांचे स्तरावरुन राष्ट्रीय आरोग्य अभियानांतर्गत मंजुर पदांची पुनर्रचना करण्याची कार्यवाही सुरु असल्याने तसेच संदर्भीय राज्य स्तरावरुन प्राप्त सुचनेनुसार मा.आयुक्त आरोग्य सेवा तथा अभियान संचालक, राष्ट्रीय आरोग्य अभियान, मुंबई यांचे कडे सादर करावयाच्या नस्तीवर HR Rationalisation नुसार जो निर्णय घेण्यात येईल, त्यानुसार जिल्हयांना रिक्त पदांच्या पदभरतीबाबत अवगत करण्यात येईल असे नमुद आहे. करिता सद्यस्थितीत सुरु असलेल्या पदभरतीस तातुपुरत्या स्वरुपात स्थगिती देण्यात येत आहे.

तसेच राज्य आरोग्य सोसायटी, मुंबई यांचे कडुन निर्णय झाल्यानंतर उमेदवारांकरिता द्यावयाच्या पदभरतीच्या पुढील सुचना जिल्हा परिषद, अकोला संकेतस्थळ WWW.akolazp.gov.in या वेबसाईटवर प्रसिध्द करण्यात येईल. त्याकरिता उमेदवारांनी वेळोवेळी संकेतस्थळावर जावून माहिती घ्यावी. या बाबत उमेदवारांना स्वतंत्रपणे कळविण्यात येणार नाही, याची सर्व संबंधीत उमेदवारांनी नोंद घ्यावी.

मुळ टिपणी मा.मु.का.अ.यांचे कडुन अनुमोदित

सदस्य सचिव तथा जिल्हा आरोग्य अधिकारी
जिल्हा एकात्मिक आरोग्य व कुटुंब कल्याण सोसायटी,
सोसायटी, जिल्हा परिषद, अकोला